दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●सपादक : अजय भाग ●उपसपादक : गणश गाडकर https://epaper.vadalvarta.com
● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.२ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये
● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 2 September 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 18 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## आझाद मैदानावर ५ हजार आंदोलकच आंदोलन करू शकतील; मुंबई मोकळी करा-कोर्टाचे आदेश

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मुंबईतल्या आझाद मैदानावर पाच हजार आंदोलकच आंदोलन करू शकतील. इतर मराठा आंदोलकांनी रस्ते आणि मुंबई मोकळी करावी, असे स्पष्ट आदेश सोमवारी झालेल्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाने दिले. शिवाय आता कोणालाही मुंबईत येऊ देऊ नका. उद्या दुपारी ४ पर्यंत जिथे रस्ते अडवण्यात आले आहेत, त्या सर्व ठिकाणांवरच्या आंदोलकांना हटवा, असे आदेश न्यायालयाने दिले.मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी मुंबईच्या आझाद मैदानात उपोषण सुरू केले आहे. तसेच संपूर्ण मुंबईत मोठ्या संख्येने राज्यभरातून मराठा समाज जमा झाला आहे. रविवारी मनोज जरांगे यांनी आपण मरेपर्यंत उपोषण करणार असल्याची घोषणा केली. परंतु, जरांगेंच्या या आंदोलनाविरोधात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर सुनावणीत उच्च न्यायालयाने काही महत्त्वाचे निर्देश दिले.मुंबई उच्च न्यायालयाने न्यायालयात मनोज जरांगे यांचा अर्ज वाचून दाखवला. या अर्जाच्या सुरुवातीलाच आमरण उपोषणाचा उल्लेख केला आहे. मात्र, आमरण उपोषणाला परवानगी नसल्याने उच्च न्यायालयाने राज्य सरकारला विचारणा केली आहे. तसेच मनोज जरांगे यांना नोटीस बजावण्यात आली आहे का? असा सवालही मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला केला आहे.

माजी सैनिकांना केवळ आझाद मैदानावर आंदोलनाची परवानगी देण्यात आली होती, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. याउलट, राज्य सरकारची बाजू अशी होती की, आंदोलनाला केवळ एक दिवसासाठी परवानगी देण्यात आली होती आणि इतरत्र आंदोलन करण्यास परवानगी नव्हती. आंदोलकांनी सर्व अटी व शर्तींचे पालन करण्याबाबत लेखी हमीपत्र दिल्यानंतरच त्यांना ही परवानगी देण्यात आली, अशी माहिती महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी न्यायालयाला दिली. न्यायालयाने नियमांचे पालन करून आंदोलन करण्याची परवानगी दिली होती आणि त्याच आधारावर ही परवानगी देण्यात आली होती. आझाद मैदान आंदोलनांसाठी आरक्षित आहे, परंतु त्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणी आंदोलन करण्यास परवानगी नाही, असेही सरकारने स्पष्ट केले.पुढे आपली बाज मांडताना राज्य सरकारने म्हटले, गणेशोत्सवात कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणं पोलिसांसाठी देखील कठीण आहे. तरी आम्ही समतोल पाळण्याचा प्रयत्न करतोय जेणेकरून कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही. शनिवारी आणि रविवारी आंदोलनाला परवानगी देण्यात आलेली नाही, केवळ ५ हजार आंदोलकांना परवानगी देण्यात आली होती. तसेच जरांगे यांनी नियमांचे उल्लंघन केल्याचे देखील सरकारने वारंवार सांगितले आहे. शहर एक खेळाचे मैदान झाले असल्याचेही राज्य सरकारने म्हटले आहे.



## धाडसी पाऊल: गौतम बुद्धांची मूर्ती प्रतिष्ठापना अखेर दलीत नेते मस्केंचा जामीन मंजूर

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील केज-बीड रोडलगत असलेल्या ३०/१ व ३०/२ या गायरान जमिनीच्या संदर्भात व्हायरल झालेल्या ऑडिओ क्लीपनंतर चर्चेत आलेले दलित नेते कपिल मस्के यांनी अखेर मौन सोडले आहे. मी ३० गुंठे जागा वैयक्तिक वापरासाठी नव्हे, तर बौद्ध विहारासाठी मागितली होती, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

गेल्या काही दिवसांत मस्के यांच्या विरोधात पत्रकार परिषदा घेऊन अनेकांनी टीका केली होती. यापूर्वी मस्के यांनी रमाईनगर येथील ३० वर्षांपासूनच्या अतिक्रमणधारकांना न्याय मिळवून देण्यासाठी केज तहसीलसमोर




आमरण उपोषण केले होते. या उपोषणाच्या यशानंतर ४०१०० चौरस फूट जागेवर गौतम बुद्धांची मूर्ती बसविण्याचे धाडसी पाऊल त्यांनी उचलले. यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता.

या प्रकरणात दाखल झालेल्या जामीन अर्जावर न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला आहे. मस्के यांनी पत्रकारांशी बोलताना, जागेची मागणी माझ्या व्यक्तिगत फायद्यासाठी नव्हती; समाजासाठी बौद्ध विहार उभारण्याच्या उद्देशानेच ती मागणी केली, असे स्पष्ट केले. गौतम बुद्धांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून घेतलेल्या या धाडसी निर्णयामुळे दलित नेते मस्केचे समाजात आणि विविध स्तरांवर कौतुक होत आहे. बौद्ध समाजातही त्यांच्या या भूमिकेचे स्वागत करण्यात येत आहे.

## आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण व स्वानंद सार्वजनिक वाचनालयात आदिवासी विकास दिन साजरा

**केज । प्रतिनिधी**

आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण,आनंदगांव ता. केज जि.बीड व स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता.केज जि. बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.३१ आगष्ट २०२५ रोजी आदिवासी दिन कार्यशाळा घेवून साजरा करण्यात आला


कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे व ग्रंथालयाचे संस्थापक, जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाजसेवक,प्राचार्य, डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून संजय सोनवणे,पाथरा येथील माजी सरपंच भगवान पवार,बबन पुंड,रावसाहेब जाधव, बाळासाहेब गायकवाड, रविंद्र गायकवाड



पेंटर यांची उपस्थिती होती.

आदिवासींचा सर्वांगीण विकास हाच देशाच्या विकासाचा अंतिम विकास असेल असे प्रतिपादन मान्यवरांनी केले. अध्यक्षीय समारोप डॉ. वसुदेवबप्पा गायकवाड यांनी केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक,सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन संस्थेचे व ग्रंथालयाचे विश्वस्त आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

## मिलिंद मस्के यांची बीड शहर काँग्रेस उपाध्यक्षपदी नियुक्ती



**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय काँग्रेस कार्यसमितीच्या सदस्या तथा हिमाचल प्रदेश प्रभारी खा.रजनीताई पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ अशोकराव पाटील यांच्या सूचनेवरून काँग्रेस पक्ष वाढीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका व पक्षाची संघटना बांधणी करण्यासाठी शहराध्यक्ष परवेश पुरेशी यांनी बीड शहर कार्यकारिणीचा विस्तार केला आहे. त्यात बीड शहरातील ज्येष्ठ कार्यकर्ते मिलिंद मस्के यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्तीचे पत्र देताना महाराष्ट्र राज्य प्रदेश सरचिटणीस दादासाहेब मुंडे व प्रदेश सरचिटणीस गणेश राऊत, निराधार विभागाचे जिल्हाध्यक्ष शेख मोहसीन बुरानोद्दीन, तालुकाध्यक्ष जहीर भाई, बीड शहरध्यक्ष परवेज कुरेशी च्या हस्ते व उपस्थितीमध्ये देण्यात आले या प्रसंगी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परळी रेल्वे स्थानक परिसरात ३५ वयवर्ष नराधमाकडून ६ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार

### ३ सप्टेंबर रोजी सर्व पक्षीय वतीने परळी बंद चे आव्हान

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात अवघ्या ६ वर्षांच्या चिमुकलीवर बलात्कारासारखी अमानुष घटना घडली असून, संपूर्ण शहरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घटनेविरोधात तीन सप्टेंबर रोजी सर्वपक्षीय वतीने परळी बंद ची हाक दिली. या वेळी सर्वपक्षीय पदाधिकारी व नागरिकांनी परळी शहर पोलीस स्टेशनला धाव घेऊन निवेदन सादर केले.

या निवेदनात संबंधित नराधमावर कठोरात कठोर कारवाई करून त्याला आदर्श शिक्षा द्यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. निर्दोष बालिकेवर झालेला हा पाशवी अत्याचार हा मानवतेला



काळीमा फासणारा घटना असून, अशा गुन्हेगारांना समाजात जागा नसल्याचे स्पष्ट शब्दांत सांगण्यात आले.तात्काळ हा पकरणाचे गाभीर्य घेऊन हे प्रकरण फास्टट्रॅक वर चालवून या नराधमास फाशी ची देण्यात यावी.अन्यथा सर्व पक्षच्या च्या वतीने जन आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला.

यावेळी उपस्थितांनी पोलिस प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, न्यायालयीन प्रक्रियेत वेग आणून आरोपीस कठोर शासन व्हावे, अशी मागणी केली. शहरातील नागरिकांमध्ये या घटनेमुळे भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, यापुढे अशा घटना घडू नयेत म्हणून पोलिसांनी सतर्कतेने काम करावे, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

## जिल्हा कचेरी समोरील बेमुदत धरणे आंदोलनकारी जयसिंग वीर प्रकृती बिघडली

**बीड । प्रतिनिधी**

करचुंडी येथील गायरान, हक्काचा सातबारा व विविध मागण्या साठी जिल्हा कचेरी समोर गेल्या पंधरा दिवसापासून गावकऱ्यांसह आंदोलनाचे नेतृत्व करणारे जयसिंग वीर यांची प्रकृती खालावली आहे. गायरान धारकांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी अनेक दिवसापासून आंदोलन करत आहेत.१५ व्या दिवशी त्यांची प्रकृती बिघडल्याने पोलीस प्रशासनाने म्बुलन्स बोलवून त्यांना बीड जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. त्यांच्यावर सध्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांनी रुग्णालयातून सांगितले आहे. जोपर्यंत गायनाचा प्रश्न मार्गी लागत



नाही तोपर्यंत आपले बेमुदत धरणे आंदोलन चालू राहणार आहे. जोपर्यंत गायनाचा प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत आपण या बेमुदत धरने आंदोलनातून माघार घेणार नाहीत अशी स्पष्ट भूमिका त्यांनी उपचारादरम्यान बेडवरून स्पष्ट केली आहे. जीव जरी गेला तरी आता या आंदोलनातून माघार नाही असं त्यांनी सांगितला आहे. या आंदोलनास सर्व स्तरातून मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे.

## मुंबई येथील आझाद मैदानावरील आंदोलन कर्त्यांच्या अवहेलनेमुळे युवकाची आत्महत्या

### खासदार बजरंग सोनवणे यांची सुगाव येथे सांत्वनपर भेट

**केज । प्रतिनिधी**


मुंबई येथे आझाद मैदानावरील सुरू असलेल्या मराठा समाजाला आरक्षण मिळावे या साठीच्या आंदोलनात उपोषणकर्त्यांची होत असलेली अवहेलना सहन न झाल्याने कै. नितीन माणिक चव्हाण यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली.ही घटना अत्यंत वेदना दायक आणि मन हेलावून टाकणारी असल्याची भावना व्यक्त करत खासदार बजरंग सोनवणे यांनी सोमवार दि.१ सप्टेंबर रोजी सुगाव ता. अंबाजोगाई येथे जाऊन त्यांच्या कुटुंबियांची भेट घेतली.या दुर्दैवी



प्रसंगी कुटुंबीयांना धीर देत खासदार सोनवणे म्हणाले की,आम्ही सर्वजण त्यांच्या दुःखात सहभागी आहोत.ईश्वर कै.नितीन चव्हाण यांच्या आत्म्यास शांती देवो आणि कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याचे सामर्थ्य लाभो हीच प्रार्थना आहे असे खा. बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे.चव्हाण यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ही घटना गंभीर मानली जात आहे.

## संपादकीय

# भ्रष्टाचारी लाभार्थी!




भ्रष्टाचार तंत्रज्ञानाने कमी होईल, की नैतिक शिकवणीने? असा प्रश्न विचारवंतांमध्ये नेहमी चर्चेला जातो. एखाद्या सुविचाराचा संस्कार करायचा किंवा समाजाची नैतिक पातळी उंचावण्याचा विचार आदर्शवादात सर्वात वर असतो. भ्रष्टाचार किंवा समाजाची नैतिक अधोगती रोखण्याचा तो सर्वात हमखास; पण सर्वाधिक वेळखाऊ मार्ग ठरतो. त्यापेक्षा तंत्रज्ञानातल्या सुधारणांनी चोरवाटा बंद करता येतात आणि भ्रष्टाचाराला प्रतिबंध करता येतो. पहिल्या मार्गाने भ्रष्टाचाराचं समूळ उच्चाटन होतं आणि व्यक्ती; पर्यायाने समाज सदाचारी बनतो. हा सकारात्मक क्रियाशील मार्ग असतो. दुसऱ्या मार्गानेही असा परिणाम साधला जातो. पण, तो नकारात्मक मार्गाने असतो. म्हणजे, भ्रष्टाचार करणं अशक्य झाल्याने किंवा सहज उघड होण्याची हमखास खात्री असल्याने भ्रष्टाचाराला आळा बसतो. तो नाईलाज असतो. तंत्रज्ञानातील प्रगतीला वळसा घालून भ्रष्टाचारी मार्गाचा अवलंब करण्याचा प्रयत्न जारीच राहतो. त्यात कधी यश येतं, कधी नाही. भ्रष्टाचाराची मूळ प्रवृत्ती मात्र कायम राहते. संस्कार वा प्रबोधनाच्या मार्गाने भ्रष्टाचार निर्मूलन करायचं झाल्यास त्याला समाजाची सर्वसाधारण सहमती लागते. ज्यांच्या हाती अशी संधी असते, त्यांना त्यासाठी तयार करणाऱ्या राजकीय, सामाजिक किंवा प्रभावी सांस्कृतिक नेतृत्वाची गरज असते. त्यासाठी प्रभावी कायदे असावे लागतात आणि त्या कायद्यांची अंमलबजावणी करणारी यंत्रणाही सजग, कार्यक्षम असावी लागते. भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशात न्यायव्यवस्था किती जलद आणि कठोरपणे कायदे राबवते यावरही बरंच काही अवलंबून असतं. दुर्दैवाने आपल्याकडे सध्या अनेक क्षेत्रांत प्रभावी नेतृत्वाची पोकळी असल्याने समाजाच्या सद्वर्तनासाठीही राजकीय नेतृत्वाकडूनच अपेक्षा केली जाते. त्यांनाच त्यासाठी दोषी धरलं जातं.हा विषय चर्चेला घेण्याचं कारण, गेल्या काही दिवसांत लागोपाठ प्रसिद्ध होत असलेल्या बातम्या. सरकारी योजना लाभार्थींपर्यंत नीट पोहोचत नाहीत किंवा योजनांच्या अंमलबजावणीत सरकारी पातळीवर मोठा भ्रष्टाचार होतो, अशा तक्रारी ऐकायची (आणि करायचीही) आपल्याला सवय आहे. 'सरकारी' हा शब्द त्यामुळेच बदनाम झाला आहे. योजना चांगल्याच असतात. त्या आखण्यामागचा, लाभार्थींना लाभ देण्याचा आणि त्यातून अंतिमतः जे साधायचं असतं, ते सगळं स्तुत्यच असतं. खरा घोळ योजनेच्या अंमलबजावणीतच असतो, असा आजपर्यंतचा सर्वसाधारण समज. दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांनी तर एकदा तशी जाहीर कबुलीही दिली होती. त्यामुळे, या समजावर शिक्कामोर्तबही झालं होतं. गेल्या काही दिवसांत प्रसिद्ध झालेल्या बातम्यांतलं वास्तव मात्र अगदी वेगळं आहे. योजनेच्या अंमलबजावणीत काही गैरव्यवहार होत असतीलही; पण लाभार्थींकडून होणारे गैरव्यवहारही काही कमी नाहीत! 'लाभ मिळवण्यासाठी, अगतिकतेपोटी ज्याला गैरव्यवहारात सामील व्हावं लागतं, तो लाभार्थी' ही व्याख्या बदलून आता 'सरकारी योजनेचा लाभ मिळवण्यासाठी जो बिनदिक्कत हेराफेरी करतो, तो लाभार्थी' अशी नवी व्याख्या रूढ होते की काय, अशी भीती यातून वाटू लागली आहे. दोन उदाहरणं पाहू. पहिलं उदाहरण आहे, मोफत रेशन योजनेचं. कोरोना काळाआधी सवलतीच्या दरात दिलं जाणारं रेशन कोरोना काळात मोफत देण्याचा निर्णय झाला. तोच नंतर कायम राहिला. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकारने त्याआधी 'अन्न सुरक्षा योजने'च्या नावाखाली हा प्रयोग केला होता. पण, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्याला व्यापक स्वरूप दिलं.८० कोटी जनतेला दर महिन्याला काही जीवनावश्यक वस्तू मोफत मिळू लागल्या. आता उघड झालेल्या माहितीनुसार, यात १ कोटी ७० लाख लाभार्थी असे निघाले, जे योजनेसाठी सर्वथा अपात्र होते! 'मोफत रेशन'चा लाभ घेणाऱ्यांपैकी ९४ लाख ७१ हजार लाभार्थी आयकर भरतात. ५ लाख ३१ हजार लाभार्थी कोणत्या ना कोणत्या कंपनीचे संचालक आहेत, तर १७ लाख ५१ हजार लाभार्थींकडे चारचाकी गाडी आहे! २०१९ ते २०२३ या पाच वर्षांत २ कोटी १८ लाख अपात्र लाभार्थींना हटवल्यानंतर हे नवे 'अपात्री' आढळले आहेत. छाननीचं काम अजूनही सुरू आहे. राज्य सरकारांना त्यासाठी सूचना देण्यात आल्या असून आयकर विभाग, उद्योग – कंपनी मंत्रालय, परिवहन विभाग आणि प्रधानमंत्री किसान योजनेच्या माहितीचा त्यासाठी आधार घेतला जातो आहे. महाराष्ट्रातल्या 'मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजने'तही गेल्या वर्षभरात १२ हजार पुरुष लाभार्थी आढळले आहेत! योजनेचा लाभ ज्या बँक खात्यात जमा होतो, त्यातली ५० लाख बँक खाती अजूनही 'आधार'ला जोडलेली नाहीत. नाशिक आणि जळगावच्या जिल्हा परिषदेत काम करणाऱ्या १५ जणांनी या योजनेचा लाभ उचलला असून त्यात एक पुरुष कर्मचारी आहे ! राज्याचा महिला व बाल कल्याण विभागही विविध यंत्रणांकडील माहिती घेऊन या योजनेचा लाभ घेणाऱ्या अपात्र लाभधारकांचा शोध घेतो आहे. तंत्रज्ञानात झालेल्या सुधारणा; विशेषतः सरकारने केलेल्या व्यापक संगणकीकरणामुळे, माहितीचे स्त्रोत परस्परांना जोडण्याच्या धोरणामुळे विविध योजनांतील असे गैरप्रकार उघड होत आहेत; आणखीही उघड होणार आहेत. आपल्या भ्रष्ट हितसंबंधांपोटी केवळ प्रशासनातील कर्मचाऱ्यांकडूनच गैरप्रकार होतात, असं नाही; जी जनता सरकारी यंत्रणेला भ्रष्टाचारासाठी दोष देते, त्यांना त्यासाठी बदनाम करते, त्या जनतेतही गैरलाभ घेणारे कमी नसतात. योजना कोणासाठी हे माहीत असूनही योजनेचा लाभ घेण्यासाठी खोटी माहिती देणारे किंवा खरी माहिती लपवणारे कोण असतात? तेही भ्रष्टाचारीच असतात. 'नाईलाजाने' भ्रष्टाचारात सहभागी होणारे नसतात; लाभासाठी 'जाणूनबुजून' भ्रष्टाचार करणारे असतात. तंत्रज्ञानातली प्रगती येत्या काळात आपल्या दृष्टिकोनात मूलभूत बदल करणार आहे, ती अशी!

# नारळाची बहुमुखी उपयुक्तता आणि मागणी

नारळाच्या झाडाला कल्पवृक्ष म्हटलं जातं. त्यापासून निर्माण होणाऱ्या सगळ्या गोष्टी या मनुष्याला उपयोगी पडतात. नारळ हा त्यापैकीच एक. नारळाचा उपयोग खाण्यासाठी, ओषधांसाठी, तेलासाठी तसेच इतर अनेक गोष्टींसाठी केला जातो. नारळाच्या शेतीपासून जगातल्या अनेक देशांत चांगला रोजगार मिळत आहे. त्यामुळे नारळाचे महत्व आणि त्याचा वापर याबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी २ सप्टेंबर हा जागतिक नारळ दिन म्हणून साजरा केला जातो. याविषयीची महत्वपूर्ण माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींच्या सदर लेखातून वाचा... संपादक.

दरवर्षी २ सप्टेंबर रोजी जागतिक नारळ दिन साजरा केला जातो. नारळाची बहुमुखी उपयुक्तता आणि त्याची मागणी लक्षात घेऊन दि. २ सप्टेंबर १९६९ रोजी एशियन आणि पॅसिफिक कोकोनट कम्युनिटी सुरू झाली. जकार्ता, इंडोनेशियात या दिवशी एपीसीसीची स्थापना देखील झाली. आपल्या देशात अनेक शतकांपासून नारळाचे आध्यात्मिक आणि औषधी मूल्य आहे. याला जर निसर्गाने दिलेली भेट म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. नारळाच्या प्रत्येक भागाला खूप महत्त्व आहे. हे उशीरा पचवणारा, मूत्राशय साफ करणारा, ग्रहण करणारा, पौष्टिक, शक्तिशाली, रक्ताविरोधी, जंतुनाशक, जंतुरोधक आणि वात-पित्त नष्ट करणारा आहे. त्याच्या थंड प्रभावामुळे, त्याचे पाणी सर्व शारीरिक समस्यांपासून आराम देते.

जागतिक नारळ दिन हा सर्वप्रथम सन २००९ साली एशिया-पॅसिफिक प्रदेश म्हणजे आशिया-प्रशांत महासागराच्या प्रदेशातील समुदायाकडून साजरा करण्यात आला. जागतिक स्तरावर नारळाच्या शेतीबद्दल जागरुकता निर्माण करणे आणि त्याला प्रोत्साहन देणे हा उद्देश जागतिक नारळ दिन साजरा करण्यामागे आहे. त्यामुळे नारळाच्या व्यापाराला मोठ्या प्रमाणात चालना मिळू शकेल. जगभरात नारळाचे उत्पादन घेतले जाते, पण आग्नेय आशियात त्याचे सर्वाधिक उत्पादन घेतले जाते. नारळाच्या उत्पादनाच्या बाबतीत इंडोनेशियाचा जगात पहिला क्रमांक लागतो. भारतातही कोकण किनारी, गुजरात पासून ते केरळपर्यंत आणि पूर्व किनाऱ्याच्या पश्चिम बंगालपासून ते तामिळनाडूपर्यंत नारळाचे उत्पादन घेतले जाते.

नारळाचे फायदे: अगदी तहान भागवण्यापासून ते फर्निचर तयार करण्यापर्यंत नारळाचे असंख्य असे फायदे आहेत. नारळामध्ये कार्बोहायड्रेट्स, मॅगनिज आणि प्रोटिन मोठ्या प्रमाणावर असतं. त्यामुळे आपले आरोग्य चांगलं राहण्यास मदत होते. म्हणूनच आजारी व्यक्तींना नारळाचे पाणी प्यायचा सल्ला दिला जातो. नारळाचे दूध आणि तेल हे आपल्या त्वचेला ग्लो आणण्यासाठी फायदेशीर आहे. नारळामध्ये आयर्न आणि सेलेनियम असते. ते एक ॲन्टिऑक्सिडन्ट स्वरुपात काम करते, त्यामुळे लाल रक्त पेशींचे संरक्षण होते. तसेच नारळ खाल्याने कोलेस्टोरॉलचा स्तर सुधारतो. नारळात व्हिटॅमिन, मॅग्नेशियम आणि पोटॅशियम हे घटक असतात. त्यामुळे ब्लड प्रेशर नियंत्रणात येते. नारळाचे पाणी रोज पिल्यास शरीरातील ग्लुकोजचे प्रमाण स्थिर राहते.

!! जागतिक नारळ दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**–श्री कृष्णकुमार आनंदी**
**गोविंदा निकोडे गुरूजी.**
**फक्त हॉट्सप–९४२३७१४८८३.**

# भारत–चीन संबंध नव्या वळणावर

अमेरिकेने लादलेल्या प्रचंड टॅरिफच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे शांघाय सहकार्य परिषदेसाठी चीनला जात आहे. गलवान खोऱ्यातील चकमकीनंतर आता भारत आणि चीनचे संबंध सुधारत आहेत. मोदी यांच्या दौऱ्यात भारत आणि चीनमध्ये सीमाप्रश्न तसेच अन्य बाबतीत काही धोरणात्मक निर्णय घेतले जातील. भारताच्या बाबतीत अमेरिकेला जे स्थान होते, ते स्थान चीन घेऊ शकेल का, याची आता चर्चा सुरू झाली आहे.बहुपक्षीय व्यापार व्यवस्था राखण्यासाठी चीन भारतासोबत खंबीरपणे उभा राहील, असे वक्तव्य भारतातील चीनचे राजदूत झू फेहोंग यांनी अमेरिकेने भारतावर लादलेल्या आयात शुल्कवाढीविरुद्ध बोलताना केले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'टॅरिफ वॉर'नंतर भारत आणि चीन अधिक जवळ यायला लागले आहे. चीन ही जगातील दुसऱ्या क्रमाकांची अर्थव्यवस्था आहे. अमेरिकेचे संरक्षण तसेच अन्य साहित्याची बाजारपेठ चीनने काबीज केली. दुसरीकडे, रशिया हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा अण्वस्त्र सज्ज देश आहे. चीन, रशिया आणि भारत हे तीन देश एकत्र येऊ नयेत, यासाठी आतापर्यंत अमेरिकेने व्यूहनीती रचली. दक्षिण आशियातील चीनचा वाढता हस्तक्षेप थांबवण्यासाठी तर अमेरिकेने भारताला मदतीचा हात पुढे केला होता. अमेरिकेला पाकिस्तानची तेवढी गरज राहिली नव्हती. रशियापासून भारताला दूर करता आले, तर करावे हाही अमेरिकेचा हेतू होता. रशिया मित्र असला, तरी भारताने अमेरिकेशी व्यापार वाढवला होता. संरक्षण साहित्याची खरेदीही वाढवली होती. अशा परिस्थितीत ट्रम्प यांच्या आयात शुल्कवाढीमुळे तसेच अन्य बेताल बडबडीमुळे भारत दुखावला. भारताची रशियाशी जवळीक आणखी वाढली. चीननेही अमेरिकेला शह देण्यासाठी भारताशी संबंध सुधारण्याची इच्छा व्यक्त केली. भारताची बाजू घेत चीनच्या परराष्ट्रमंत्र्यांनी भारतात येऊन काही करार केले. आता नरेंद्र मोदी शांघाय सहकार्य परिषदेसाठी चीनला जात आहे. अशावेळी भारतासाठी चीन अमेरिकेचे स्थान घेऊ शकेल का, अशी चर्चा सुरू झाली असली, तरी पूर्वानुभव पाहता व्यापार सहकार्य करताना चीनवर किती विश्वास ठेवायचा, हा प्रश्न आहे.गलवान संघर्षानंतर तीन प्रमुख खिंडीमधून भारत आणि चीनमधील व्यापार थांबला होता. आता तो पुन्हा सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी



यांनी नवी दिल्ली येथे भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि मोदी यांची भेट घेतली. विस्तृत चर्चेनंतर एक संयुक्त दस्तावेज जारी करण्यात आला. दस्तावेजात म्हटले आहे की दोन्ही देशांनी सीमा व्यापार पुन्हा सुरू करण्यास सहमती दर्शवली आहे. हा व्यापार तीन नियुक्त मार्गांनी होईल. अमेरिकन टॅरिफविरुद्ध आवाज उठवणाऱ्या देशांमध्ये चीन आघाडीवर आहे. दोन्ही देशांमधील कटुता इतकी वाढली होती, की अमेरिकेने चिनी वस्तूंवर १४५ टक्के कर लादला होता तर चीनने अमेरिकन उत्पादनांवर १२५ टक्के कर लादला होता.

त्यानंतर मे २०२५ मध्ये जीनिव्हा येथे झालेल्या बैठकीत दोन्ही देशांनी व्यापार कराराअंतर्गत टॅरिफ कमी केले. असे असूनही दोन्ही देशांमधील टॅरिफचा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही. चीनने पुन्हा एकदा अमेरिकेविरुद्ध आवाज उठवला; परंतु यावेळी त्याने भारताची निवड केली. अमेरिकेची तुलना धमकावणाऱ्या खलनायकाशी करताना चीनचे मुत्सद्दी शू फेहोंग म्हणाले, की ते बऱ्याच काळापासून मुक्त व्यापाराचा फायदा घेत आहेत; परंतु आता ते इतर देशांकडून जास्त किमती मागण्यासाठी सौदेबाजीचे शस्त्र म्हणून टॅरिफचा वापर करत आहे. अमेरिकेने भारतावर पन्नास टक्क्यांपर्यंत किंवा आणखी जास्त टॅरिफ लादण्याचा चीन तीव्र विरोध करतो. त्यांनी दोन्ही देशांचे वर्णन आशियातील आर्थिक विकासाचे डबल इंजिन म्हणून केले आणि सांगितले, की भारत आणि चीनमधील एकतेचा फायदा संपूर्ण जगाला होईल. युक्रेन युद्धानंतर भारताने रशियाकडून कच्च्या तेलाची आयात वाढवली होती. यामुळे अमेरिकेसोबतच्या संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला आणि व्यापार करारावरील वाटाघाटींवर परिणाम झाला. भारताने युक्तिवाद केला, की बायडेन प्रशासनाने जागतिक ऊर्जा बाजारपेठ स्थिर करण्यासाठी भारताला रशियन तेल खरेदी करण्यास सांगितले होते. मात्र आता युक्रेन युद्धात भारत रशियाच्या युद्धयंत्रणेला पाठिंबा देत असल्याचे अमेरिकेचे म्हणणे आहे.एकीकडे, भारताच्या अमेरिकेसोबतच्या व्यापारी संबंधांमध्ये अस्थिरता दिसून येत आहे, तर दुसरीकडे, भारत आणि चीनमधील संबंध वेगाने मऊ होत आहे. २०२० मध्ये लडाखमधील गलवान येथे झालेल्या संघर्षानंतर दोन्ही शेजाऱ्यांमधील संबंध बिघडले. तेव्हापासून चीन आणि भारत हळूहळू संबंध सामान्य करण्याच्या दिशेने काम करत आहेत. चीन असो किंवा अमेरिका, दोन्ही देशांविरुद्ध जनतेच्या भावना तीव्र आहेत. लोक कोणाच्या विरोधात जास्त आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. चीनशी दीर्घकाळापासून सीमा वाद आहे; परंतु ट्रम्प आणि मोदी यांच्यात मैत्री असूनही एकतर्फी कर लादणे हे भारतासाठी धक्कादायक आहे. ट्रम्प यांनी भारतावर लादले तितके शुल्क भारताच्या शेजारील देशांवर लादले नाही. म्हणूनच येथे अमेरिकाविरोधी भावना चीनविरोधीपेक्षा कमी नाही. भारत आणि चीनमधील वाढत्या जवळीकतेशी संबंधित अनेक घटकांपैकी अमेरिका हा एक घटक आहे. गेल्या काही महिन्यांपासून दोन्ही देशांमध्ये सतत चर्चा सुरू होती.चीन आर्थिकदृष्ट्या समृद्ध असून भारताचा एक महत्त्वाचा व्यापारी भागीदार आहे. अमेरिका आणि भारत यांच्यातील मजबूत भागीदारी, विशेषतः क्वाड (भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया)सारख्या गटांद्वारे चीनच्या प्रादेशिक प्रभावाचे संतुलन साधण्याचा प्रयत्न करते. 'क्वाड' देश औपचारिक लष्करी युतीऐवजी अनौपचारिक गट म्हणून वावरतात; परंतु चीन याकडे स्वतःविरुद्धची काही देशांची युती म्हणून पाहतो. भारत आणि अमेरिका यांच्यातील तणाव वाढला तर ही भागीदारी कमकुवत होऊ शकते. त्यामुळे इंडो-पॅसिफिक प्रदेशात चीनचा प्रभाव वाढू शकतो. जपानदेखील ट्रम्प यांच्या १५ टक्के अमेरिकन टॅरिफवर खूश नाही. ट्रम्प ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांना भेटत नाहीत. परिणामी, सध्या क्वाडच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह लागले आहे. भारत आणि चीन 'ब्रिक्स'सारख्या संघटनांद्वारे 'ग्लोबल साउथ'च्या नेतृत्वात उभे रहात आहेत. दोन्ही देश 'ग्लोबल साउथ'च्या देशांना एकत्र करून पाश्चात्य देशांचे वर्चस्व संतुलित करतात. भारताने आतापर्यंत वेगवेगळ्या जागतिक व्यासपीठांवर धोरणात्मक स्वायत्तता राखण्याचा प्रयत्न केला आहे. एकीकडे, भारत अमेरिका आणि पाश्चात्य देशांसोबत 'क्वाड' संघटनेत सहभागी आहे, तर दुसरीकडे 'ब्रिक्स' आणि शांघाय सहकार्य परिषदेत चीन आणि रशियासोबत सहकार्य करत आहे. ही स्वायत्तता भारताला जागतिक व्यासपीठावर अधिक प्रभावशाली बनवते. कारण भारत पूर्णपणे पश्चिमेसोबत नाही किंवा चीनच्या नेतृत्वाखाली नाही. अमेरिकेबरोबरच्या दुराव्यामुळे भारत आता सावधगिरीने पुढे जाईल. चीन आर्थिक महासत्ता बनल्यामुळे वरचढ आहे; परंतु 'ग्लोबल साउथ'चे नेतृत्व करण्याचा मार्ग चीनसाठी सोपा नाही, कारण 'ग्लोबल साउथ'च्या सर्व देशांचे चीनबद्दल समान मत नाही.चीनच्या 'गुआंचा' या प्रमुख वेबसाइटवर प्रकाशित झालेल्या एका अहवालात म्हटले आहे की ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात भारताशी असलेल्या जवळच्या संबंधांचे फायदे आता मिळणार नाहीत. या बदलांचा फायदा चीनला होऊ शकतो. शू फेईहोंग यांनी 'एक्स'वरील पोस्टद्वारे अमेरिका आणि चीनशी होत असलेल्या भारताच्या व्यापाराची तुलना केली. या पोस्टमध्ये 'ग्लोबल टाईम्स'चे एक ग्राफिक आहे. त्यानुसार २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारत आणि चीनमधील व्यापार १२७.७१ अब्ज डॉलर्स होता, तर अमेरिका आणि भारतातील व्यापार १३२.२१ अब्ज डॉलर्स होता. तथापि, अमेरिका भारतासाठी सर्वात मोठा निर्यातदार आहे, तर गेल्या काही वर्षांमध्ये चीनसोबत भारताची व्यापार तूट सतत वाढत आहे. अशा परिस्थितीत प्रश्न असा आहे की चीन भारतासाठी अमेरिकेला पर्याय असू शकतो का? याचे उत्तर नाही असे आहे. त्याचे कारण चीन आणि पाकिस्तानमधील मैत्रीत कोणताही फरक पडणार नाही. त्यामुळे चीन कधीही अमेरिकेची जागा घेऊ शकत नाही.

# केसगळतीची समस्या वाढलीये? 'हे' पान खाल्ल्यास आरोग्य राहिल निरोगी

**दैनिक राज आनंद । वृत्तसेवा**

आजकाल तुम्ही व्यस्त जीवनशैलीमुळे आणि चुकिच्या खाण्या पिण्याच्या सवयीमुळे आरोग्याकडे लक्ष देता येत नाही. आयुर्वेदात असे अनेक कढीपत्त्याचे नाव ऐकताच आपल्याला चविष्ट सांभार, नारळाची चटणी, कढी, कढीपत्त्याचा वापर केलेल्या सर्व सुगंधी गोष्टी आठवू लागतात. कढीपत्त्यामुळे केवळ जेवणाची चव वाढतेच नाही तर ते आरोग्यासाठी खूप फायदेशीर देखील असतात. कढीपत्त्यामध्ये किंवा कढीपत्त्यामध्ये भरपूर पोषक तत्वे असतात. दक्षिण भारतीय जेवणात कढीपत्त्याचा वापर खूप केला जातो.कढीपत्ता त्यात कोणते पोषक घटक आहेत आणि ते सेवन करण्याचे फायदे काय आहेत ते येथे जाणून घ्या.

**कढीपत्त्यामध्ये असलेले पोषक घटक**

कढीपत्त्यामध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट्स असतात, जे आरोग्याशी संबंधित अनेक समस्या दूर ठेवतात. त्यात जीवनसत्त्वे अ, ब, क, ई, कॅल्शियम, फॉस्फरस, लोह, मॅग्नेशियम, तांबे, फायबर, फ्लेव्होनॉइड्स, अमीनो ॲसिड इत्यादी भरपूर प्रमाणात असतात.

**कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रणात ठेवा –** कढीपत्त्यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स रक्तातील कोलेस्टेरॉलचे ऑक्सिडेशन रोखतात. यामुळे शरीरात वाईट कोलेस्टेरॉल तयार होण्यापासून रोखले जाते आणि चांगले कोलेस्टेरॉल वाढते. यामुळे तुमचे हृदय निरोगी राहते.

**पचनक्रिया चांगली राहते–** कढीपत्ता खाल्ल्याने पचनक्रियाही चांगली राहते. कढीपत्ता शरीरातील फुगणे, सूज येणे, कचरा आणि विषारी पदार्थ काढून



टाकण्यास मदत करतो.

**यकृतासाठी आरोग्यदायी –** कढीपत्त्यामध्ये असलेले टॅनिन संयुगे, व्हिटॅमिन ए, सी सर्व विषारी पदार्थांना निष्प्रभ करतात. ते एंजाइमची क्रिया वाढवतात, ज्यामुळे यकृताचे कार्य योग्य राहते. यकृत निरोगी राहते.

**डोळ्यांसाठी फायदेशीर –** कढीपत्त्याचे नियमित सेवन केल्याने दृष्टी कमकुवत होत नाही. कढीपत्त्यामध्ये व्हिटॅमिन ए भरपूर प्रमाणात असते, ज्यामुळे डोळ्यांचे अनेक प्रकारचे आजार दूर राहतात. मोतीबिंदू, दृष्टीदोष इत्यादी टाळता येतात. त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स डोळ्यांचे एकूण आरोग्य निरोगी ठेवतात.

**केसांच्या योग्य वाढीसाठी –** जर तुमचे केस गळत असतील, डोक्यातील कोंडा असेल, टाळूवर खाज येत असेल, फोड आणि मुरुमे येत असतील तर तुम्ही कढीपत्त्याचे सेवन करावे. त्यात अँटीफंगल आणि अँटीऑक्सिडंट घटक असतात, जे केस आणि टाळू निरोगी ठेवतात. हे केस मजबूत करतात आणि त्यांना चमकदार बनवतात.

**वजन कमी करा –** कढीपत्ता खाल्ल्याने किंवा कढीपत्त्याचे पाणी पिल्याने वजन कमी होण्यास मदत होते. ते चयापचय वाढवते आणि शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकते.

**रक्ताभिसरण सुधारते –** याचे नियमित सेवन केल्याने शरीरात रक्त व्यवस्थित चालू राहते. महिलांना मासिक पाळीशी संबंधित अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. पोटदुखी, डोकेदुखी, चिडचिड यापासूनही आराम मिळू शकतो.

**मधुमेहात खावे –** जर तुम्हाला मधुमेह असेल आणि तुमची साखरेची पातळी सामान्य नसेल तर कढीपत्ता चावून खा. कढीपत्त्याचा रस किंवा कढीपत्त्याचे पाणी पिल्याने साखरेची पातळी नियंत्रणात राहते. त्यात असलेले संयुगे इन्सुलिनचे उत्पादन वाढवतात, ज्यामुळे शरीरात रक्तातील ग्लुकोजची पातळी योग्य राहते.

**जखमा लवकर बऱ्या होतात –** कढीपत्ता जखमा लवकर बऱ्या करण्यास देखील प्रभावी आहे. जखमांवर, लालसरपणा, जळजळ, खाज इत्यादींवर कढीपत्त्याची पेस्ट लावणे खूप फायदेशीर आहे. त्यात असलेले उपचारात्मक गुणधर्म आणि अँटीमायक्रोबियल घटक जखमा लवकर बऱ्या होण्यास मदत करतात आणि संसर्गापासून देखील संरक्षण करतात

# खडकवासला-फुरसुंगी भूमिगत कालवा प्रकल्पाला केंद्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाचा 'हिरवा कंदील'-आ.कुल

## २२०० कोटींच्या योजनेमुळे सिंचनक्षेत्राची वाढ व पाणी प्रदूषण नियंत्रणाची अपेक्षा

**पुणे । प्रतिनिधी**

खडकवासला धरण ते फुरसुंगी या दरम्यान प्रस्तावित सुमारे २८ किलोमीटर भूमिगत बंदनळी (कालवा) प्रकल्पाला आता प्रत्यक्ष गती मिळाली आहे. या प्रकल्पासंदर्भात शनिवार (दि. ३० ऑगस्ट) रोजी कार्यकारी अभियंता योगेश सावंत आणि मेगा इंजिनिअर्सचे व्यवस्थापक राजा यांच्या उपस्थितीत आमदार राहुल कुल यांनी सविस्तर चर्चा केली. प्रकल्प ठरलेल्या वेळेत आणि समन्वयाने पूर्ण करण्याबाबत बैठकीत स्पष्ट निर्देश देण्यात आले.
सुमारे २२०० कोटी रुपये खर्चाच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पास राज्य सरकार, केंद्र शासन तसेच संबंधित तांत्रिक संस्थांची सर्व मान्यता मिळालेली आहे. विशेष म्हणजे केंद्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाने 'हिरवा कंदील' दाखविल्यामुळे आता या योजनेची



अंमलबजावणी प्रत्यक्षात सुरू होण्यास कोणताही प्रशासकीय अडथळा उरलेला नाही. या प्रकल्पाद्वारे खडकवासला धरणातील पाणी भूमिगत बंदनळीमार्फत थेट फुरसुंगीपर्यंत पोहोचवले जाणार आहे. यामुळे पारंपरिक उघड्या कालव्यांमधून होणारी पाण्याची गळती मोठ्या प्रमाणात रोखली जाईल आणि पाण्याची बचत होईल. प्रशासनाच्या अंदाजानुसार, या योजनेमुळे दौंड तालुक्यासह ग्रामीण भागातील सिंचनक्षेत्र लक्षणीयरीत्या वाढेल. शेतकऱ्यांसाठी सुमारे ३ टीएमसी हंगामी पाणी उपलब्ध होऊन उत्पादनक्षमता वाढेल आणि उत्पन्नात सुधारणा होईल, अशी अपेक्षा आहे. दरम्यान, या प्रकल्पाचा फायदा फक्त ग्रामीण भागापुरता मर्यादित राहणार नाही. पुणे शहरातील पाणीप्रदूषण नियंत्रणासाठीही या योजनेतून मदत होणार आहे. ग्रामीण आणि शहरी पातळीवरील ही दुहेरी गरज भागवल्यामुळे राज्यातील हा प्रकल्प 'महत्त्वाकांक्षी' ठरणार आहे. बैठकीनंतर अधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रकल्पाला वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी एकाच धाग्यावर काम करणे आवश्यक आहे. समन्वय साधून दर्जेदार पद्धतीने काम केल्यास हा प्रकल्प जलसंपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरेल. खडकवासला धरणातून उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा अधिक कार्यक्षम उपयोग करण्यासाठी भूमिगत कालवा हा उपाय ठरत असून, या माध्यमातून शेती, ग्रामीण विकास आणि शहरी जलपुरवठा या तिन्ही आघाड्यांवर सकारात्मक परिणाम होणार आहे.

# ग्रामपंचायत फणसवणे गुरववाडी परिसरातील ग्रामस्थांचा राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गटात) सामूहिक पक्षप्रवेश

## प्रत्येक गावाचा विकास हीच आमची प्राथमिकता-आ.शेखर निकम

**संगमेश्वर । प्रतिनिधी**

गावाच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र येत फणसवणे गुरववाडी, गराटेवाडी, वणेवाडी, बालदेवाडी, बौद्धवाडी येथील ग्रामस्थांनी कार्यसम्राट आमदार शेखर निकम यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गटात)जाहीर प्रवेश केला.गेल्या पाच वर्षांत आमदार शेखर निकम यांनी आपल्या शांत, संयमी आणि सर्वसमावेशक कार्यशैलीतून गावपातळीवर भरीव विकासकामे केली आहेत. सध्या सुरू असलेल्या विविध प्रकल्पांमुळे परिसरात विकासाचा नवा ध्यास निर्माण झाला असून, त्याचाच प्रत्यय या प्रवेशातून आला आहे.
या प्रसंगी आमदार निकम यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत, गावाच्या प्रगतीसाठी टप्पा टप्प्याने योजनाबद्ध पद्धतीने कामे केली जातील. विकास हीच आमची प्राथमिकता आहे, असे आश्वासन दिले.या सामूहिक प्रवेशावेळी प्रमुख उपस्थितीत गावातील मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते. त्यामध्ये गावकर (स्थानिक) गणपत गुरव, प्रकाश



काजवे (अध्यक्ष, मुंबई), दिलीप कदम (सचिव), मोहन गुरव (उपसरपंच), विजय गुरव (सचिव, मुंबई), पुरुषोत्तम वणे (कार्याध्यक्ष स्थानिक), रविंद्र गराटे (मुंबई), वामन गुरव (मानकरी), बापू गुरव, शिवशंकर वणे, अनंत गुरव, वसंत वणे, राजन गराटे, गणपत गराटे, मोहन बालदे, सिद्धार्थ कदम, सुरेश गुरव, ग्रामपंचायत सदस्य विनित गराटे, माधुरी गुरव, वणे, दिनेश वने, दिनेश बालदे, अश्विनी बालदे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# राष्ट्रीय आरोग्य कर्मचाऱ्यांचा संप सुरूच आरोग्य सेवा विस्कळीत होण्याची शक्यता

**नवीन पनवेल । प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांचा संप अलिबाग येथे १२ व्या दिवशीही सुरू आहे. शासनासोबत दोन वेळा बैठक झाली परंतु त्यावर तोडगा निघाला नाही. या संपात पनवेलमधून २ आणि रायगडमधील ९ असे कुष्ठरोग निर्मूलनमधील ११ कर्मचारी सहभागी झाले आहेत. सरकारी सेवेतील समावेशासह विविध मागण्यासाठी रायगड जिल्ह्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानातील ६०० हुन अधिक अधिकारी आणि कर्मचारी यांनी १९ तारखेपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. यामुळे सरकारी रुग्णालयातील अत्यावश्यक सेवेसह अतिदक्षता विभाग, लसीकरण औषध वितरण यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समिती अंतर्गत विविध आरोग्य कामगार संघटना प्रथमच यामध्ये सक्रिय झाल्या आहेत. यामध्ये अधिकारी आणि कर्मचारी यांचा सहभाग असल्याने सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर परिणाम होणार आहे. हे सर्व सरकारी रुग्णालयात आरोग्य विभागाच्या नियमित सेवेत असलेल्या आरोग्य कर्मचाऱ्याबरोबर खांद्याला खांदा लावून काम करतात. परंतु त्यांना पगार कमी मिळतो १०




वर्षापेक्षा अधिक काळ सेवेत असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ७० संवर्ग आहेत. शासनाच्या २०२४ मध्ये सहसा निर्णय जारी करून त्यांना सरकारी सेवेत संयोजन करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र त्यापैकी केवळ चतुर्थ श्रेणीतील आणि चालक यांचेच समायोजन झाले उर्वरितांच्या तोंडाला पाने पुसली गेल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.२०२२ मध्ये समायोजनाचा आदेश उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने दिले होते. त्यावर ३० टक्के मंजूर पदावर समायोजनाचा निर्णय घेण्यात आला. पण दीड वर्ष झाले तरी हा निर्णय आमलात आणला नाही. त्यासह १५ टक्के मानधन वाढ तात्काळ लागू करणे. बदली धोरण, भविष्य निर्वाह निधी व विमा योजना सेवेत असताना मृत्यू झाल्यास ५० लाख, अपंगत्व आल्यास २५ लाख सानुग्रह अनुदान आदी १८ मागण्या मान्य कराव्यात अशी आंदोलकांची मागणी केली आहे. १२ दिवसापासून बेमुंदत संप पुकारल्यामुळे राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम वरती परिणाम होत आहे. एकूण ११ पीएमडब्ल्यू हे संपामध्ये सहभागी आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील संपूर्ण कार्यक्रमा वरती त्याचा परिणाम होत आहे. एलआरसी सेवा रुग्ण सेवा ठप्प झाली आहेत. कारण राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम अंतर्गत कंत्राटी कर्मचारी काम करत आहेत कायम स्वरूपी एलटी कोणीही नसल्यामुळे कुष्ठरोग रुग्ण औषध, उपचार व इतर सोई सुविधांपासून वंचित राहात आहेत.

# कर्जतमधून लोकलने मुंबईकडे मराठ्यांसाठी भाकरीचा भारा



**कर्जत । प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील मराठा समाज बांधवांनी पुन्हा एकदा आपल्या बांधिलकीचे दर्शन घडवले आहे. मराठा आरक्षणासाठी मुंबईत सुरु असलेल्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून कर्जत मधून भाकरीचा ओघ थेट मुंबईकडे रवाना झाला.रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुका हा मुंबईच्या जवळ असल्याने, गेले अनेक वर्षे कर्जतकर बांधवांनी मराठा लढ्यात सातत्याने आपला सिंहाचा वाटा उचलला आहे. शनिवार, दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी मुंबईत उपासमार होऊ नये या हेतूने कर्जतमधील समाज बांधवांनी भाकरी एकत्रित करण्याचे नियोजन केले. संध्याकाळी ४.५७ वाजताच्या लोकलने हा भाकरीचा भारा मुंबईकडे रवाना झाला.दरम्यान, या उपक्रमासाठी समन्वयकांनी सकाळी केलेल्या आवाहनाला कर्जतकरांनी मोठ्या उत्साहाने प्रतिसाद दिला. अवघ्या काही तासांतच क्यूआर कोडच्या माध्यमातून साधारण लाखभर आर्थिक मदतकाही वेळातच जमा झाली. मदतीचा ओघ अजूनही सुरू असल्याचे समन्वयकांनी सांगितले.मराठा आरक्षणाच्या लढ्यात कर्जतकरांचा हातभार कायम राहिला आहे आणि पुढेही राहणार आहे, हे या उपक्रमातून पुन्हा सिद्ध झाले आहे. समाजासाठी केलेली ही भावना आणि एकजूट ही कर्जतकरांची खरी ओळख असल्याचे अभिप्राय व्यक्त होत आहेत.

# भटक्या विमुक्त समाजात शिक्षण हेच खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवणारे साधन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय व उमेद सोशल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बोल्हेगाव, गांधी नगर येथील कै. बाळासाहेब केशव ठाकरे जिल्हा परिषद शाळेत भटके विमुक्त दिवस साजरा करण्यात आला. युवक कल्याण योजनेतंर्गत शालेय विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करून औषधोपचार करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.काकासाहेब म्हस्के हॉस्पिटलचे डॉ. यश चौधरी व डॉ. आझाद शेख यांनी शालेय विद्यार्थ्यांची तपासणी करून त्यांना आवश्यक ते औषधोपचार दिले. लहान मुलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास उमेद फाऊंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे, सचिव सचिन साळवी, सल्लागार ड. दीपक धीवर, उमंग फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. संतोष गिऱ्हे, मुख्याध्यापक अक्षय सातपुते, तसेच रवी साखरे,



विजय लोंढे, प्रकाश भालेराव, रवी सुरेकर, अंबादास जाधव, अक्षय गाडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.फाऊंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे म्हणाले की, भटक्या विमुक्त समाजात शिक्षण हेच खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवणारे साधन आहे. या समाजात शिक्षणाची जाणीव निर्माण करून शैक्षणिक मदत उपलब्ध करून देणे हा फाऊंडेशनचा संकल्प आहे. यासोबतच विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे लक्ष देऊन जिल्हा परिषद व मनपा शाळांमध्ये तपासणी उपक्रम सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुख्याध्यापक अक्षय सातपुते यांनी उमेद सोशल फाऊंडेशनने शाळेत भटके विमुक्त दिवस साजरा करून विद्यार्थ्यांना आत्मसन्मान दिला असून, या उपक्रमामुळे त्यांच्या मनात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असल्याचे सांगितले.शाळेच्या सहशिक्षिका सुरेखा घुले, प्रीती जाधव, गयाबाई गिते, वर्षा दिवे, श्रीमती एस. म्हस्के, तसेच सहशिक्षक योगेश राजळे, सुनील रोटे यांनीही उपस्थित राहून कार्यक्रमाचे आयोजन यशस्वी केले. शाळेतील अनेक विद्यार्थ्यांना नेहमीसाठी आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध नसते, त्यामुळे पालकांनी या उपक्रमाचे कौतुक केले. या कार्यक्रमाला जिल्हा क्रीडा कार्यालयाचे जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, प्रवीण कोंढावळे, प्रियंका खिंडारे यांचे मार्गदर्शन लाभले.

# गॅस स्फोटाने उद्ध्वस्त झाले शिवने गावातील भोजने कुटुंब गणेशोत्सवाची तयारी सुरु असताना काळाचा घाला

**संगमेश्वर । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर घडलेल्या एका भीषण दुर्घटनेने संगमेश्वर तालुक्यातील शिवणे गवळवाडी गावावर शोककळा पसरली आहे. कोल्हापुरातून मूळ गावी गणपती साजरा करण्यासाठी येण्याच्या तयारीत असलेल्या भोजने कुटुंबावर अचानक काळाने घाला घातला.. घरात झालेल्या गॅसच्या स्फोटात शीतल अमर भोजने यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून त्यांच्या दोन चिमुकल्या लेकरांना आईचा आधार कायमचा गमवावा लागला आहे.गॅस पाईपलाईनमधील गळतीमुळे खोलीत अचानक स्फोट झाला. या स्फोटात शीतल भोजणे यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या पाच वर्षांच्या प्रज्वल आणि तीन वर्षांच्या इशिका या दोन बालकांना आईविना पोरके होण्याची वेळ आली. या घटनेत प्रज्वल आणि इशिकाही जखमी झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.या घटनेत आजोबा अनंत भोजने (६०) यांचीही प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. डॉक्टरांनी त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले आहे.अमर भोजने हे गेली चार वर्षे कुटुंबासह कोल्हापुरात वास्तव्यास होते. ते एलआयसी कॉलनीजवळील एका भागात राहत होते आणि हॉटेलमध्ये कुक म्हणून काम करत होते. गणेशोत्सवासाठी कुटुंबाने मूळ गावी जाण्याचा बेत आखला होता. मात्र, अमर यांची रात्रपाळीची ड्युटी असल्याने 'एक रात्र थांबून सकाळी निघू' असा निर्णय घेतला गेला. याच निर्णयाने त्यांचं आयुष्य बदलून टाकलं.भोजने यांच्या घरात गॅस पाईपलाईनची जोडणी अर्धवट अवस्थेत होती. घराबाहेर खिडकीजवळ गॅस मीटर बसवण्यात आला होता. मात्र, गॅस सुरू झाला होता, याची कल्पना कुटुंबाला नव्हती. रात्री शीतल यांनी जेवण गरम करण्याचा प्रयत्न करताच अचानक स्फोट झाला.घटनेची माहिती मिळताच शिवणे गवळवाडी गावातील ग्रामस्थांनी कोल्हापुरात धाव घेतली. सरपंच राजू पवार यांनी त्यांच्या नातेवाइकांकडे कुटुंबाची विचारपूस केली आणि ग्रामपंचायतीमार्फत सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले.

# निव्याचा राजा सार्वजनिक गणेश उत्सव मंडळा तर्फे अणेक सामाजिक उपक्रमाचे आयोजन

**संगमेश्वर । प्रतिनिधी**

निव्याचा राजा सार्वजनिक गणेश उत्सव मंडळश्रच्या वतीने आरोग्य तपासणी, रक्तदान, नेत्र तपासणी आदी कार्यक्रमाचे आयोजन करून या मंडळाने सामाजिक ऐक्य राखले असल्याने तालुक्यात या मंडळाच्या कार्याचे कौतुक होत आहे. देवरुख नजीक निवे ब्रुदुक येथील युवा गणेश मित्र मंडळ निव्याचा राजा सार्वजनिक गणेश उत्सवा चे औचित्य साधतं आज रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर,नेत्र तपासणी शिबिर आयोजित करणेत आले होते.यां शिबिराला ग्रामस्थ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला . निवे बु. गणेश मंडळ मंडळ गेली १९ वर्षे नव नवीन उपक्रम राबवित आहे .जिल्हा शासकिय रुणालयाच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात



आले, या शिबिरात सुमारे ४० लाभार्थी यांनी रक्त दान केले. प्रा. आ. केंद्र धामापूर उपकेंद्र निवे बु. वतीने आरोग्य शिबिर घेण्यात आले यामध्ये आयुष्यमान कार्ड विषयी जनजागृती, मधुमेह, उच्चरक्तदाब, थंडी, ताप यांविषयी तपासणी करण्यात आली .लायन्स आय केअर वतीने मोफत नेत्र तपासणी व मोतिंबिंदू लाभार्थी निवड करण्यात आली.रक्तदान या करिता निवे बु. संत निरकांरी मंडळ निवे बु. यांच्या अनुयांनानी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला . या शिबिराला ग्रामस्थानी भरभरून प्रतिसाद दिल्याने युवा गणेश मित्र मंडळ कार्यकर्ते यांनी समाधान व्यक्त करून सर्वांचे आभार मानले.

# फेस बामखेडा परिसरात बिबट्याचा थरारक

# लहान बालिका थोडक्यात बचावली

**शहादा । लाला चव्हाण**

शहादा तालुक्यातील फेस बामखेडा परिसरात बिबट्याने चांगलाच धुमाकूळ घातला आहे. भर दिवसा बिबट्याचे दर्शन होत असल्याने बिबट्याच्या धास्तीने परिसरात घबराट निर्माण झाले आहे. रविवारी सायंकाळी फेस शिवारातील संजय पाटील यांच्या शेतात रखवालदार म्हणून काम करणारे पंढरीनाथ ठाकरे यांचे कुटुंब गुरांसाठी चारा काढत असतांना भला मोठा बिबट्या मकाच्या शेतातुन लहान मुलगीच्या दिशेकडे येत असल्याचे दिसून आल्याने कुटूंबियांनी धाव घेत आरडाओरडा केल्याने बिबट्या माघारी फिरल्याने पुढील अनर्थ टळला. येथील मातीवर बिबट्याचे पायाचे ठसे दिसून आल्याने. नागरिकांसह शेतकरी, शेतमजुरांमध्ये भीती पसरली आहे. गेल्या महिनाभरापासून वडाळी, खैरवे, फेस, तोरखेडा बामखेडा आदी.मानवी वस्तीलगतच्या शेत शिवारात बिबट्या रात्री, व दिवसा ढवळ्या मुक्त संचार करीत आहे . काही दिवसांपूर्वी तोरखेडा शेत शिवारात पाळीव प्राण्यांवर हल्ला करून बिबट्याने ती फस्त केल्याची घटना घडली आहे. तर मागील आठवड्यात देखील बामखेडा गावळगतच्या माध्यमिक विद्यालय मागील बाजूस दोन वरहाचा फडशा फाडल्याची घटना घडली आहे. तसेच फेस मानवी आदिवासी वस्तीलगत दिवसा बिबट्यांची टोळीचे दर्शन झाल्याने वनविभागाकडून बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावण्यात आला होता.परंतु पिंजऱ्याच्या ठिकाणी गुंगारा देत पसार झाल्याने अथक प्रयत्न करून देखील वनविभागाला अपयश आले. दिवसा ऊसाच्या ठिकाणी बिबट्या लपून बसत आहे. त्याला त्वरित जेरबंद करण्यात यावे. अशी मागणी करण्यात येत आहे.



पावसाने मोकळीत दिल्याने शेती कामांना वेग आला आहे. त्यातच परिसरात ठीक ठिकाणी बिबट्याचे मुक्त संचार दिसून येत असल्याची भीतीमुळे मजूर कामावर येण्यास धजावत नाही त्यामुळे शेतीचे काम तूर्तास खोळंबळे आहे.
–वासुदेव चौधरी.शेतकरी बामखेडा

फेस शिवारात मी रखवालदारीचे काम करतो रविवारी सायंकाळी मी आणि कुटुंबिय काही अंतरावर गुरांसाठी चारा काढत असताना . बिबट्या लहान मुलगीच्या दिशेने येत असल्याचे दिसल्याने आरडा ओरडा केली असता बिबट्या माघारी फिरला.बिबट्याचे रुद्ररुप पाहून आम्ही पूर्णतः घाबरून गेलो आहोत शेतात रात्री वीज नसल्याने अंधारात राहावे लागते, तरी वन विभागास बिबट्याच्या पायाचे ठसाचा फोटो सोशल मीडियावर पाठवून सदर घटनेची माहिती दिली आहे. वनविभागाने बिबट्याला त्वरित जेरबंद करून दिलासा द्यावा.
–पंढरीनाथ ठाकरे रखवालदार

## वकर्तुंड गणेश मंडळा च्या वतीने अनाथाश्रम मधील व्यक्तीना अन्नदान, महादेव कराड यांनी व्यक्त केले आभार



**केज । प्रतिनिधी**

वकर्तुंड गणेश मंडळ प्रशांत नगर केज च्या वतीने केज शहरात असणाऱ्या स्वामी समर्थ अनाथाश्रम मध्ये नाविलाजाने राहणाऱ्या व्यक्ती ना गौरी पूजना च्या निमित्ताने घरी बनणारे जेवण मिळावे या उद्देशाने गौरी पूजन च्या दिवशी घरच्या जेवणाची पंगत दिली.

गौरी पूजनाच्या दिवशी प्रत्येक घरी पुरणपोळी, कडी,आमटी,१६ प्रकारच्या भाज्या,वरण तूप,भात आदी जेवण बनवल जाते पण अनाथाश्रम मध्ये राहणाऱ्यांना मिळेलच असे नाही म्हणून या वर्षी पहिल्यांदाच अनाथाश्रम मध्ये राहणाऱ्यांना पण घरचे जेवण मिळावे म्हणून वकर्तुंड गणेश मंडळा च्या वतीने घरगुती जेवण देण्यात आले. यावेळी अनाथाश्रमाचे संचालक महादेव कराड यांनी गणेश मंडळाचे आभार मानले तसेच यावेळी गणेश मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

## तळोदा येथे भारतीय जैन संघटनेतर्फे 'सन्मान गुरुजनांचा सोहळा कर्तृत्वाचा, कार्यक्रम संपन्न

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा येथील पीई सोसायटीच्या शेठ केडी हायस्कूलमध्ये भारतीय जैन संघटनेच्या वतीने सन्मान गुरुजनांचा, सोहळा कर्तृत्वाचा हा कार्यक्रम नुकताच पार पडला. या कार्यक्रमात निवृत्त शिक्षकांच्या योगदानाला आदराने गौरवण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पीई सोसायटीचे अध्यक्ष लक्ष्मणराव बबनराव माळी होते, तर प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष भोये आणि पोलीस निरीक्षक राजेंद्र लोखंडे उपस्थित होते. याशिवाय, शेठ केडी हायस्कूलचे मुख्याध्यापक जितेंद्र माळी आणि भारतीय जैन संघटनेचे जिल्हाध्यक्ष डव्होकेट अल्पेश जैन यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.



या सोहळ्यात एकूण १८ सेवानिवृत्त शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये अशोक सूर्यवंशी, दिलीप पटेल, राजाराम राणे, शरद सूर्यवंशी, सदाशिव चित्ते, जयश्री पाटील अशा अनेक शिक्षकांचा समावेश होता. या सर्व शिक्षकांना सन्मानपत्र, शाल, श्रीफळ आणि वृक्षारोपण देऊन गौरविण्यात आले. यावेळी मनोगत व्यक्त करताना सेवानिवृत्त शिक्षकांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि भारतीय जैन संघटनेच्या या स्तुत्य उपक्रमाचे आपल्या शब्दात कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापिका पूजा जैन यांनी केले. त्यांनी शिक्षकांचे स्थान समाजात दीपस्तंभासारखे मोलाचे असते, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपमुख्याध्यापक प्रकाश वानखेडे यांनी केले, तर रमेशकुमार भाट यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन भारतीय जैन संघटनेचे जिल्हाध्यक्ष डव्होकेट अल्पेश जैन, राहुल जैन, आशिष जैन, दीपेश जैन आणि कुशल जैन यांनी केले. कार्यक्रमाला शेठ के.डी. हायस्कूलचे सर्व शिक्षक, कर्मचारी आणि भारतीय जैन संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिन अर्ज निकाली काढण्याचे निर्देश

**नंदुरबार । दिपक गोसावी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिन: अर्ज निकाली काढण्याचे निर्देश. जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित होणाऱ्या जिल्हास्तरीय लोकशाही दिन कार्यक्रमात नागरिकांच्या समस्यांवर थेट कार्यवाही केली जाते. दिनांक ०१ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या लोकशाही दिनात, अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे यांनी नागरिकांकडून प्राप्त झालेल्या अर्जांवर तातडीने कार्यवाही करून ते निर्धारित वेळेत निकाली काढण्याचे आदेश संबंधित विभाग प्रमुखांना दिले.



प्रशासन आणि जनतेमध्ये संवाद साधणारा हा एक महत्त्वपूर्ण मंच आहे. या बैठकीत, मागील लोकशाही दिनापासून (०४ ऑगस्ट २०२५) प्रलंबित असलेल्या १२ अर्जांवर चर्चा करण्यात आली. याशिवाय, दिनांक ०६ जानेवारी २०२५ ते ०४ ऑगस्ट २०२५ या कालावधीत एकूण ६१ नवे अर्ज प्राप्त झाले होते. आजच्या बैठकीत नव्याने ०३ अर्ज दाखल झाले.

याप्रसंगी, अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व अधिकाऱ्यांना सूचना दिल्या की, तक्रार अर्जांचे निराकरण प्राधान्याने आणि कार्यक्षमतेने होणे आवश्यक आहे. लोकशाही दिनाचा उद्देश नागरिकांना त्यांच्या तक्रारींचे निवारण जलद गतीने मिळवून देणे हा आहे. त्यामुळे, प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जाचा पाठपुरावा करून त्याचा योग्य तो निकाल वेळेत लावणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे.या पुढाकारामुळे, प्रशासनावर जनतेचा विश्वास वाढण्यास मदत होईल आणि सार्वजनिक कामकाजात अधिक पारदर्शकता येईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## श्रीगणेशा आरोग्य अभियानांतर्गत आरोग्य शिबिराचे उत्साहात आयोजन

**मोलगी । रवींद्र वळवी**

१ सप्टेंबर २०२५ रोजी पिंपळखुटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये श्रीगणेशोत्सवाच्या निमित्ताने 'श्रीगणेशा आरोग्य' अभियानाखाली एका भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली २५ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, २७ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या कालावधीत तालुक्याच्या विविध ठिकाणी अशा आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

या उपक्रमाचा उद्देश अति दुर्गम भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हा होता. पिंपळखुटा येथे आयोजित या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात गरजूंना तात्काळ वैद्यकीय तपासणी, उपचार आणि आवश्यकतेनुसार पुढील उपचारांसाठी संदर्भ सेवा पुरवण्यात आली.



शिबिरासाठी लागणाऱ्या औषधांचा साठा आणि वैद्यकीय उपकरणे पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यात आली होती. ग्रामपंचायत पिंपळखुटाच्या सन्माननीय सरपंच, रंजनाताई राऊत, यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य, अशोक राऊत, यांनी शासनाच्या विविध आरोग्य आणि कल्याणकारी योजनांची माहिती देऊन नागरिकांचे प्रबोधन केले. प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळखुटा येथील डॉ. रवी पाडवी आणि डॉ. प्रियंका वळवी यांनी उपस्थितांना शिबिराचे महत्त्व समजावून सांगितले आणि या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले. आरोग्य कर्मचारी, आशा सेविका आणि स्थानिक स्वयंसेवकांच्या मदतीने दुर्गम भागातील अनेक रुग्णांना शिबिरापर्यंत पोहोचवणे शक्य झाले.या यशस्वी उपक्रमामुळे आरोग्य सेवा दूरवरच्या नागरिकांपर्यंत पोहोचवण्यास मदत झाली असून, 'श्रीगणेशा आरोग्य' अभियानाच्या यशासाठी हे एक सकारात्मक पाऊल ठरले आहे.

# कंपनी मोठी होण्यासाठी कर्मचाऱ्यांचा विश्वास महत्वाचा–लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल । प्रतिनिधी**

कोणतीही कंपनी मोठी व्हायची असेल तर त्यासाठी कर्मचाऱ्यांचा विश्वास महत्वाचा असतो. टीआयपीएल कंपनीमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तो विश्वास सिद्ध करून जीव तोडून काम करतात असे गौरवोद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्यावेळी काढले. दानशूर व्यक्तीमत्व असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमीत्त विविधि उपक्रम राबवले जात आहेत. त्यापार्श्वभुमीवर ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट प्रायव्हेट लिमीटेड अर्थात टीआयपीएल कंपनीमधील कर्मचाऱ्यांच्या इयत्ता दहावी आणि बारावी परिक्षेमध्ये उज्वल यश संपादीत केल्या पाल्यांचा सत्कार सोहळा शनिवारी आयोजीत करण्यात आला होता. हा सन्मान सोहळा खांदा कॉलनी मधील सीकेटी महाविद्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले कि, आत्ता पासून दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला जाईल. टीआयपीएलमधील कर्मचाऱ्यांच्या मुलांना पुढील शिक्षणासाठी देखील कंपनी मदत करेल. तसेच टीआयपीएलच्या कर्मचाऱ्यांच्या मुलांना देखील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या महाविद्यालयांमध्येही ५० टक्के फी माफी देण्याचे त्यांनी जाहीर केले. या कार्यक्रमात लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृहनेते परेश ठाकूर आणि टीआयपीएलचे डायरेक्टर अमोघ ठाकूर यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी टीआयपीएलचे डायरेक्टर सीएच भरणीकुमार, एम.पी.त्यागी, अरुण नाईक, जगदीश घरत, शशिकांत मुंबईकर, आनंद लाल, सतीश उगले, दीपक सिन्हा यांच्यासह टीआयपीएलचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, आपण जो शब्द देतो तो पाळतो हा विश्वास कंपनीच्या अधिकारी आणि कार्मचाऱ्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली निर्माण केला. तर परेश ठाकूर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सध्याचे हे स्पर्धेचे युग आहे. जेवढे महत्व परिक्षांमध्ये गुणांना आहे तितकेच महत्वाचे व्यक्तिमत्व विकासही आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी या कौशल्य गुणावर भर द्यावे, असे आवाहन केले.

या कार्यक्रमात दहावीच्या परिक्षेत कार्तिकी आर्गे, सानीका पाटील, स्वरा खेडकर, दुर्वा कडू, श्रेया घरत, पार्थ मोहिते, वैदेही म्हात्रे, अव्नी लाल, सेजल ठाकूर, युग मोकल, करुण्या गायकर, अनन्या चौहान तसेच बारावीच्या परिक्षेत श्रद्धा श्रीवास्तव, पार्थ सकपाल, गार्गी काले, जय तांडेल, शुभम कोळी, काजल कुमारी व इतर विद्यार्थ्यांचा घवघवीत यश संपादन केल्याबद्दल सत्कार करण्यात आला.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077